# जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, मौजे मोशी येथील गट नं ४६७पै, ४५४पै व ४५२पै नागरिकांना दळणवळणासाठी रस्ता उपलब्ध नाही त्यामुळे महानगरपालिकेसही तेथील रहिवाश्यांना मुलभूत / सुविधा जसे रस्ता, विद्युत खांब, पाणीपुरवठा व जलनिस्सारण वाहिनी इत्यादी सुविधा पुरविता येत नाही. सदर रहिवासीयांच्या अडीअडचणीचा यथोचित विचार करून तेथील लोकप्रतिनिधीनी सदर ठिकाणी मौजे मोशी येथील गट नं ४६७ चे उत्तरेकडील १८ मी रस्त्यापासुन नविन गट नं ४५४ मधील विद्युत उच्चदाब वाहिनीखालील रस्त्यापासुन नविन गट नं ४५२ पर्यंत व तेथुन नाल्याकडेने नाशिक रस्त्याला जोडणारा रस्ता मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत १२.०० मी रूंदीचा मनपा रस्ता घोषित सोबतचे नकाशात दर्शविल्याप्रमाणे रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित करणेकामी मा. इ प्रभाग समिती सभा ठराव क्र. १५, दि. १५/१०/२०१७ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. व मा. आयुक्त यांना प्राप्त अधिकारानुसार मौजे मोशी येथील गट नं ४६७ चे उत्तरेकडील १८ मी रस्त्यापासुन नविन गट नं ४५४ मधील विद्युत उच्चदाब वाहिनीखालील रस्त्यापासुन नविन गट नं ४५२ पर्यंत व तेथुन नाल्याकडेने नाशिक रस्त्याला जोडणारा रस्ता मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत १२.०० मी रूंदीचा मनपा रस्ता घोषित करणेकामी मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने नकाशात दर्शविल्याप्रमाणे १२.० मी मनपा रस्ता घोषित करण्याचा इरादा जाहिर केलेला आहे.

सदर घोषित करावयाच्या रस्त्याचा आराखडा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात उपलब्ध करण्यात आलेला आहे. याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत/ सूचना असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती/ सूचनांवर योग्य तो विचार करून इराद्याप्रमाणे म्युनिसिपल रस्ता घोषित करण्यात येईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकत/ सूचना विचारात घेतली जाणार नाही.

स्थळ – पिंपरी, पुणे

दिनांक - १८ /११/२०१७

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

जाहिरात क्र. ९९६
दिनांक २२/११/१७